# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य व सन्मान

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील, ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेश

**। ललकार वृत्त ।**

सांगली, दि. ५ (प्रतिनिधी) - क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले.





भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रुपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

सुरवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# ३७२ क्रीडापटूंचा शासकीय सेवेत थेट समावेश

## चंद्रकांत पाटील : शासनाच्या धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य : कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उद्घाटन

**सांगली / प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतीशील धोरणामुळे राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेत विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.



**सांगली : कृष्णा नदीपात्रात सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कयाकिंग स्पर्धेतील एक क्षण.**

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते रविवारी सकाळी येथील वसंतदादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आदी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रुपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठ शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धा स्थळाची खास वैशिष्ट्ये आहेत.

प्रारंभी मंत्री पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन केले. डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यानी सूत्रसंचालन केले, श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

Sangli Edition
Apr 06, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com






# वार्ता सम्राट

संपादक : प्रकाश कांबळे (लिंगनूरकर)

Postal Reg.No.KLP-346/2026-2028 RNI No.MAHMAR/2016/72710 email :vartasamrat@gmail.com

* वर्ष १० वे * अंक १९ वा * रविवार दि.५ एप्रिल २०२६ * पृष्ठ ४ * किंमत ५ रूपये *


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ एप्रिल दरम्यान फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन

कोल्हापूर/प्रतिनिधी : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या पाच दिवसाच्या सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाचा उद्घाटन समारंभ शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षि शाहू सभागृह मुख्य इमारत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मान्यवरांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मचिंतन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

शनिवार दि.११ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र सभागृहात क्रांतीबा जोतीराव फुले यांची जयंतीनिमित्त मा. प्राचार्य जी. पी. माळी यांचे क्रांतीबा जोतीराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म या विषयावर व्याख्यान होईल.



रविवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता शिवाजी विद्यापीठाचया @ShivVarta या युट्यूब चॅनेलवर प्रा. रमेश जाधव यांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामुलक समाज निर्मितीचे कार्य या विषयावर व्याख्यान

सोमवार दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता, राजर्षि शाहू सभागृह, मुख्य इमारत, शिवाजी विद्यापीठ येथे प्रा.डॉ.प्रकाश कांबळे लिखित, वर्तमान उपयुक्त अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असूनय या परिसंवादामध्ये डॉ. प्रवीण जाधव व डॉ. गिरीश मोरे सहभागी होत आहेत.तर त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता, राजमाता जिजामाता बहुउद्देशीय सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभाग व शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक, कबीर नाईकनवरे यांचा सलाम संविधान भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा मुख्य कार्यक्रम संपन्न होणार असून सकाळी ८ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारत मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत राजर्षि शाहू सभागृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक व पूजन व सकाळी १० वाजता प्रा. डॉ. प्रशांत बनसोडे यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष या विषयावर व्याख्यान संपन्न होईल.

१० एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे व संचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र शिवाजी विद्यापीठ प्रा. (डॉ.) श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# राज्य शासनाच्या धोरणांमुळेच क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान

## ■ मंत्री चंद्रकांतदादा पाटील : ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेशन; सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उद्घाटन

**जनप्रवास । सांगली**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोर येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज रविवारी येथे केले.





**सांगली : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील. यावेळी आ. सुधीरदादा गाडगीळ, शिवाजी विद्यापिठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, संजय परमणे आदी. दुसऱ्या छायाचित्रात स्पर्धेतील क्षण.**

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते आज रविवारी सकाळी येथील कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.



# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील; ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेशन

■ बंधुता न्यूज नेटवर्क

**सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उत्साही उद्घाटन**

सांगली : क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले.

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.





मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

सुरुवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

तरुण भारत

लक्षवेधी

३७२ जणांना थेट नोकरी : सांगलीत अखिल भारतीय कॅनॉईंग-कयाकिंग स्पर्धांचे दिमाखात उद्घाटन

# क्रीडापटूंना शासनाचा मजबूत आधार : चंद्रकांत पाटील

त. भा. प्रतिनिधी





**सांगली :** क्रीडा क्षेत्र करिअरचा सक्षम पर्याय म्हणून पुढे येत असून महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणांमुळे क्रीडापटूंना स्थैर्य व सन्मान मिळत आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. विविध क्रीडाप्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना विनापरीक्षा शासकीय सेवेत थेट समाविष्ट करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे. आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने विविध धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग-१ शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग-२, तर राज्यस्तरीय विजेत्यांना वर्ग-३ व ४ पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्यांना २ कोटी रुपये, राष्ट्रीय स्तरावर १ कोटी रुपये, तर राज्य स्तरावर ५० लाख रुपये रोख पारितोषिके देण्यात येत आहेत.



यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय नेमबाज तेजस्विनी सावंत यांच्या यशाचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून मिळणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धांसाठी सज्ज होत असून देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा उभारल्या जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश गोसावी यांनी शिवाजी विद्यापीठाची क्रीडा क्षेत्रातील परंपरा अधोरेखित केली. कृष्णा नदीवरील स्पर्धास्थळाचा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक आणि स्थिर पाण्याचा प्रवाह ही वैशिष्ट्ये असल्याने सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण केले. त्यानंतर प्रदर्शनीय सामन्यांना 'फ्लॅग ऑफ' देऊन स्पर्धांना प्रारंभ झाला. डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी केले.

दैनिक सत्यदूत

# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान: मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेश; सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उत्साही उद्घाटन

दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या



शिवाजी विद्यापीठातर्फे सांगली येथे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग स्पर्धेचे फ्लॅग ऑफने उद्घाटन करताना महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील. शेजारी प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, डॉ. शरद बनसोडे, आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील आदी.३

प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रुपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले. मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर

पुढारी



सांगली : कनोईंग व कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ना. चंद्रकांत पाटील. सोबत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ. शरद बनसोडे, आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील आदी.



सांगली : आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेतील एक क्षण. (छाया : सचिन सुतार)

# २०३६ च्या ऑलिंपिकची तयारी करा ; देशाचे नाव उज्ज्वल करा

## ना. चंद्रकांत पाटील यांचे आवाहन ; कनोईंग, कयाकिंग स्पर्धांचा प्रारंभ

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

'२०३६ मध्ये ऑलिंपिक स्पर्धा भारतात होणार आहेत. देशातील विविध शहारांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून केंद्र सरकार त्याची आतापासूनच जोरदार तयारी करत आहे. ऑलिंपिक टार्गेट ठेवून जोमाने तयारीला लागा. जास्तीत जास्त मेडल्स मिळवून आपणाला आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करायचे आहे, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे कालपासून जोरदार सुरुवात झाली. ना. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रदर्शनीय सामन्यांना त्यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

### क्रीडा क्षेत्राबाबत शासनाची चांगली धोरणे

क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी राज्य शासनाने खूप चांगली धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे.विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर एक कोटी आणि राज्य स्तरावर ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात असल्याची माहिती ना. पाटील यांनी दिली.

### स्पर्धेची उत्सुकता

स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार असून कयाकिंगमध्ये के-१, के-२, के-४ तसेच कॅनोईंगमध्ये सी-१, सी-२ असे २०० मी., ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होतील.

> कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक, ही या कृष्णा नदीतील स्पर्धा स्थळाची खास वैशिष्ट्ये आहेत.
>
> **- डॉ. सुरेश गोसावी,**
> प्रभारी कुलगुरू,
> शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत



सांगलीतील कृष्णा नदीपात्रातील वैशिष्ट्यपूर्ण अशा ट्रॅकमध्ये कनोईंग, कयाकिंग स्पर्धेस रविवारी प्रारंभ झाला. यावेळी खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळाली. छाया : नंदकिशोर वाघमारे

# सांगलीत कृष्णा नदीपात्रात कनोईंग, कयाकिंगचा थरार

## देशभरातील ४० विद्यापीठांतील ६८५ पुरुष-महिला खेळाडू सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** येथील कृष्णा नदीपात्रात रविवारी अखिल भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धेस प्रारंभ झाला. स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठातील ६८५ पुरुष-महिला खेळाडू सहभागी झाले आहेत. या खेळाडूंच्या कौशल्याचा थरार दोन्ही क्रीडा प्रकारात पाहायला मिळाला.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते कृष्णा नदीकाठावरील रॉयल बोट क्लब येथे या स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापी उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे, आदी उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्यांना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. भारत २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले केले. श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

# कागलच्या जैव विविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातर्फे पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे



कोल्हापूर : कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले आहेत.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्युकेशन सोसायटीतर्फे कागल येथे जैव विविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम चालू आहे. या ठिकाणी शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागाच्या वतीने नुकतेच पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.

तीव्र उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पक्ष्यांसह छोट्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने सार्थ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. त्यानुसार हिंदी अधिविभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उद्यानात श्रमदानातून दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले. वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुद्धे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाणवठे तयार करण्यात आले. हिंदी अधिविभागातील डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले तसेच संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

अमोल बुद्धे यांनी उपस्थितांना पक्ष्यांसाठी तयार घरटी वाटप केली व त्यांचे महत्व समजून सांगितले. यावेळी डॉ. दिलीप माळी यांनी जैव विविधता उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, प्रकल्पाचे भविष्यातील नियोजन, सामाजिक महत्व तसेच जैव विविधतेची गरज याबद्दल माहिती दिली. हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस
• सोमवार दि ६ एप्रिल २०२६ •

# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील : ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेशन

## सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उत्साही उद्घाटन




**१. शिवाजी विद्यापीठातर्फे सांगली येथे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील. मंचावर उपस्थित मान्यवर २. सांगली येथे सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कयाकिंग स्पर्धेतील एक क्षण.**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली : क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.**

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रुपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.
सुरवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला.
क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यानी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

सकाळ

# शासनाच्या कृतिशील धोरणामुळे खेळाडूंना स्थैर्य

## मंत्री चंद्रकांत पाटील; सांगलीत अखिल भारतीय कनोईंग-कयाकिंग स्पर्धेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**सांगली, ता. ५ : ''क्रीडा क्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून पुढे येत आहे. राज्य शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणांमुळे राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य व सन्मान मिळत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना राज्य शासनाच्या सेवेत विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे. २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी देश सज्ज होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात जागतिक दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा उभारल्या जात आहेत,'' असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.**





सांगली : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेचे ध्वज उंचावून उद्घाटन करताना चंद्रकांत पाटील. शेजारी डॉ. सुरेश गोसावी, आमदार सुधीर गाडगीळ, डॉ.शरद बनसोडे, डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, श्रीनिवास गायकवाड आदी. दुसऱ्या छायाचित्रात' कृष्णा'काठावर सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेतील चुरशीचा एक क्षण.

भारतीय विद्यापीठे महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते कृष्णा नदीकाठावर झाले, त्या वेळी ते बोलत होते. प्रारंभी श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून ध्वजवंदन केले. त्यानंतर मंत्री पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनीय सामन्यांना प्रारंभ करण्यात आला. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी होते.

मंत्री पाटील म्हणाले, ''क्रीडा क्षेत्रात करिअर घडवणाऱ्या तरुणांसाठी शासनाने प्रोत्साहनपर धोरणे आणली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग-एकची नोकरी, राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग-दोन, तर राज्यस्तरीय विजेत्यांना वर्ग-तीन व चारची पदे देण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी रोख पारितोषिकांची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्यांना २ कोटी रुपये, राष्ट्रीय स्तरावर एक कोटी रुपये आणि राज्य स्तरावर ५० लाख रुपये, अशी बक्षिसे देण्यात येतात.'' आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत हिचे पालकत्व घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक शास्त्रीयदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचित आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या स्पर्धा स्थळाची वैशिष्ट्ये आहेत.''

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
06/04/2026 Page No. 2

0 6 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय कनोईंग व कयाकिंग स्पर्धांना सांगलीत उद्यापासून प्रारंभ

**सांगली/प्रतिनिधी :**

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे उद्यापासून (रविवार, दि. ५) प्रारंभ होत आहे. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्या सकाळी ९ वाजता कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित राहणार असून सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचीही यावेळी उपस्थिती असेल.

या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये K1, K2, K4 तसेच कनोईंग मध्ये C1, C2 असे 200 मी. 500 मी. व 1000 मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होतील. सदर स्पर्धेचा लाभ सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

# कागलच्या जैव विविधता उद्यानात विद्यापीठातर्फे पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे

कोल्हापूर/प्रतिनिधी :

कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले आहेत.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्युकेशन सोसायटीतर्फे कागल येथे जैव विविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम चालू आहे. या ठिकाणी शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागाच्या वतीने गेल्या सोमवारी (दि. ३०) पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. तीव्र उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पक्ष्यांसह छोट्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने सार्थ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. त्यानुसार हिंदी अधिविभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उद्यानात श्रमदानातून दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले. वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुद्धे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाणवठे तयार करण्यात आले. हिंदी अधिविभागातील डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले तसेच संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

श्री. बुद्धे यांनी उपस्थितांना पक्ष्यांसाठी तयार घरटी वाटप केली व त्यांचे महत्व समजून सांगितले. यावेळी डॉ. दिलीप माळी यांनी जैव विविधता उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, प्रकल्पाचे भविष्यातील नियोजन, सामाजिक महत्व तसेच जैव विविधतेची गरज याबद्दल माहिती दिली. हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम
कोल्हापूर
Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

ऐकत रहा mango FM 90.4

● सोमवार दि.६ एप्रिल २०२६ ● पाने ४ ● वर्ष ३६ ● अंक ०४४ ● कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत १ ●

## सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उत्साही उद्घाटन

# शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान : चंद्रकांतदादा पाटील

**सांगली/प्रतिनिधी :**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले.



भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

सुरवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यानी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 APR 2026
पुढारी

# एमबीए, एमएमएस सीईटी प्रवेश परीक्षा आजपासून

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी घेण्यात येणारी मास्टर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (एमबीए/एमएमएस) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सीईटी प्रवेश परीक्षा सोमवार, दि. ६ ते बुधवार, दि. ८ एप्रिल या कालावधीत तीन दिवस बॅचनुसार पार पडणार आहे. राज्यातील १७३ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होत आहे.

यावर्षी प्रथमच राज्यातील विद्यार्थ्यांना मबीए/एमएमएससाठी सीईटीच्या दोन संधी मिळत आहेत. यातील पहिल्या संधीची सीईटी ६ ते ८ एप्रिलला सुरू होत आहे. दुसऱ्या संधीची सीईटी ९ मे रोजी होणार आहे.

0 6 APR 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान शाखेच्या ओपन इलेक्टिव्हचे विद्यार्थ्यांसाठी दोन्ही पर्याय उपलब्ध

## शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषद बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विज्ञान शाखेच्या ओपन इलेक्टिव्ह विषयावर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी प्रॅक्टिकल व थेअरी यापैकी कोणता पर्याय निवडावा याची मुभा त्यांना देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या शनिवारी झालेल्या विद्या परिषद बैठकीत झाला.

विद्या परिषदेची बैठक प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ३६ विषयांवर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेतले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची उपस्थिती होती. बाडे महाविद्यालय, पुनाळ व दिंडे महाविद्यालय, बीडशेड यांना त्रुटीमुळे परीक्षा केंद्र न देण्याचा निर्णय झाला. पुढील वर्षी कमिटीच्या तपासणीनंतर केंद्र दिले जाणार आहे. काही महाविद्यालयांना निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव नाकारले. शाहू कॉलेज (एमएस्सी-केमेस्ट्री), श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज (बी. व्होक), सायबरमधील वुमेन्स कॉलेज ऑफ नॉन कव्हेंशनल, संजीवन ग्रुप पन्हाळा येथील काही कोर्स व आशा कॉलेज बंद प्रस्तावास मंजुरी दिली. प्रयोगशाळा संशोधन केंद्र मंजुरीसाठी समिती गठीत करण्याचा निर्णय झाला. कराड येथील महिला महाविद्यालय को-एज्युकेशनला मान्यता दिली. संलग्नीकरण व नूतनीकरणासाठी कमिटी नेमण्याचा निर्णय झाला. यावेळी डॉ. मंजिरी मोरे-देसाई, डॉ. सुषमा नायकवडी, डॉ. वर्षा मैंदर्गी, सुनील चव्हाण उपस्थित होते.

### पात्रता गरजेची....




एआयसीटीकडील बीबीए, बीसीए कोर्ससाठी एमसीए व नेट शैक्षणिक पात्रता असणे गरजेचे आहे. एका वर्षासाठी नेमणूक करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच, संलग्नीकरण फी संदर्भात पुन्हा कमिटी नेमण्याचा निर्णय विद्या परिषद बैठकीत घेतला.

0 6 APR 2026 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जनसंपर्क कक्ष

# ADRENALINE RUSH

Pic courtesy: Alok Jatratkar



**WINNER TAKES IT ALL!** The Association of Indian Universities and Shivaji University, Kolhapur (SUK), have jointly organised an all-India competition of canoeing and kayaking in the Krishna river of Sangli district. The two-day competition kickstarted on Sunday at the Krishna Ghat, which provides a track of nearly 950m for the competition. Over 680 students from 40 universities participated in various events, including 200m, 500m and 1000m races. The results will be announced on Monday

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 APR 2026
लोकमत



सांगलीतील कृष्णा नदीपात्रातील वैशिष्ट्यपूर्ण अशा ट्रॅकमध्ये कनोईंग, कयाकिंग स्पर्धेस रविवारी प्रारंभ झाला. यावेळी खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळाली. छाया : नंदकिशोर वाघमारे

# सांगलीत कृष्णा नदीपात्रात कनोईंग, कयाकिंगचा थरार

## देशभरातील ४० विद्यापीठांतील ६८५ पुरुष-महिला खेळाडू सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** येथील कृष्णा नदीपात्रात रविवारी अखिल भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धेस प्रारंभ झाला. स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठातील ६८५ पुरुष-महिला खेळाडू सहभागी झाले आहेत. या खेळाडूंच्या कौशल्याचा थरार दोन्ही क्रीडा प्रकारात पाहायला मिळाला.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते कृष्णा नदीकाठावरील रॉयल बोट क्लब येथे या स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापी उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे, आदी उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्यांना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. भारत २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले केले. श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

0 6 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य

## मंत्री चंद्रकांत पाटील : सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धा : ३७२ क्रीडापटूंचा शासकीय सेवेत थेट समावेश

- **आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर एक कोटी, राज्य स्तरावर ५० लाखांची बक्षिसे**



**सांगली : येथे शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनॉईंग व कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत दिनकर पाटील, डॉ. ज्योती जाधव, डॉ. सुरेश गोसावी, सुधीर गाडगीळ, डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे आदी.**

**जनप्रवास : कोल्हापूर**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

भारतीय विद्यापीठे महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते शनिवारी येथील कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद केली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.

मंत्री पाटील यांनी सांगितले की, भारत सन २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. सुरुवातीला मंत्री पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.



**स्पर्धा स्थळाची खास वैशिष्ट्ये**

डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

0 6 APR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





सांगली : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेचे ध्वज उंचावून उद्‍घाटन करताना चंद्रकांत पाटील. शेजारी डॉ. सुरेश गोसावी, सुधीर गाडगीळ, डॉ. शरद बनसोडे, डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, श्रीनिवास गायकवाड. दुसऱ्या छायाचित्रात 'कृष्णा' काठावर सुरू असलेल्या कनोईंग व कयाकिंग स्पर्धेतील क्षण.

# कृतिशील धोरणांमुळे खेळाडूंना स्थैर्य

## मंत्री चंद्रकांत पाटील; सांगलीत कनोईंग-कयाकिंग स्पर्धेला प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : 'क्रीडा क्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून पुढे येत आहे. राज्य शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणांमुळे राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य व सन्मान मिळत आहे. विविध क्रीडा प्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना राज्य शासनाच्या सेवेत विनापरीक्षा थेट सामावून घेतले आहे. २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी देश सज्ज होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात जागतिक दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा उभारल्या जात आहेत,' असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

भारतीय विद्यापीठे महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धेचे उद्‍घाटन त्यांच्या हस्ते सांगलीत कृष्णा नदीकाठावर झाले, त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ध्वजवंदन केले. त्यानंतर मंत्री पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनीय सामन्यांना प्रारंभ झाला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

मंत्री पाटील म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग-एकची नोकरी, राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग-दोन, तर राज्यस्तरीय विजेत्यांना वर्ग-तीन व चारची पदे देण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी रोख पारितोषिकांची तरतूद केली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्यांना दोन कोटी, राष्ट्रीय स्तरावर एक कोटी आणि राज्यस्तरावर ५० लाख रुपये, अशी बक्षिसे देण्यात येतात.' आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंतचे पालकत्व घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, 'कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक शास्त्रीयदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून, पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचित आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या स्पर्धा स्थळाची वैशिष्ट्ये आहेत.'

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

0 6 APR 2026
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

लक्षवेधी

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील : सांगलीत अ. भा. आंतरविद्यापीठ कनॉईंग, कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटन**

# उत्कृष्ट ३७२ खेळाडूंना मिळाली थेट शासकीय नोकरी

प्रतिनिधी, कोल्हापूर

क्रीडाक्षेत्र हा जीवनात करिअरचा सक्षम पर्याय म्हणून समोर येत आहे. विविध क्रीडा प्रकारांत उत्तुंग कामगिरी केलेल्या ३७२ खेळाडूंना विनापरीक्षा शासनाच्या नोकऱ्या दिल्या आहेत. शासनाच्या या कृतिशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी रविवारी येथे केले.



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनॉईंग व कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत दिनकर पाटील, डॉ. ज्योती जाधव, डॉ. सुरेश गोसावी, आमदार सुधीर गाडगीळ, डॉ. विलास शिंदे, योगेश लोहकरे, डॉ. शरद बनसोडे आदी.

भारतीय विद्यापीठे महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. (कै.) वसंतदादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील

पान ९ पाहा

**भारत ऑलिम्पिक आयोजनासाठी सज्ज होतोय...**

आगामी २०३६ साली भारतात ऑलिम्पिक आयोजित केले जात आहे. मोठ्या नियोजनाखाली ऑलिम्पिक आयोजित करण्यासाठी भारत सज्ज होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तर देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभा करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना तब्बल २ कोटी तर राष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्ण विजेत्याला १ कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. राज्य क्रीडा स्पर्धेतील यशस्वींना ५० लाख रुपयांची बक्षीसे दिली जात आहे. या बक्षीसांमुळे खेळाडूला सरावासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाची चिंता मिटली आहे, असेही मंत्री पाटील यांनी केले.

# उत्कृष्ट ३७२ खेळाडूंना मिळाली थेट शासकीय नोकरी

पान १ वरून

रॉयल बोट क्लब येथे स्पर्धा आयोजित केली होती. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. मंत्री पाटील यांच्या हस्ते आज सकाळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्याच हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ध्वजारोहणही करण्यात आले. मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रदर्शनीय शर्यतीला सुरुवात केली.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, तरुणांनी क्रीडा क्षेत्रात करिअर करावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रोत्साहनपर अनेक धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना क्लास वनची थेट शासकीय नोकरी तर राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूंना क्लास-टू नोकरी मिळणार आहे. राज्य स्पर्धेतील विजेत्यांना क्लास-थ्री व फोरची नोकरी मिळेल.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिक्षण, संशोधन व क्रीडा क्षेत्रातील ६ दशकांची समृद्ध परंपरा शिवाजी विद्यापीठाला लाभली आहे. देशातील विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठ तर क्रीडा क्षेत्रात अग्रस्थानी आहे. कनोईंग व कयाकिंग स्पर्धेसाठी कृष्णा नदी पात्रात बनवलेला ९४० मीटरचा अडथळेमुक्त ट्रॅक शास्त्रीयदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. पात्रातील पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे स्पर्धक विद्यापीठांना विजेतपद जिंकण्याची समान संधी मिळणार आहे. आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापी उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे व काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले. अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

0 6 APR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २०३६ च्या ऑलिम्पिकची तयारी करा; देशाचे नाव उज्ज्वल करा

## ना. चंद्रकांत पाटील यांचे आवाहन; कनोईंग, कयाकिंग स्पर्धांचा प्रारंभ



सांगली : आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेतील एक क्षण. (छाया : सचिन सुतार)



सांगली : कनोईंग व कयाकिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ना. चंद्रकांत पाटील. सोबत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ. शरद बनसोडे, आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील आदी. (छाया : सचिन सुतार)

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

भारतात २०३६ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहेत. देशातील विविध शहरांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून, केंद्र सरकार त्याची आतापासूनच जोरदार तयारी करत आहे. ऑलिम्पिकचे टार्गेट ठेवून जोमाने तयारीला लागा. जास्तीत जास्त मेडल्स मिळवून आपणाला आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करायचे आहे, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

### स्पर्धेची उत्सुकता

स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार असून, कयाकिंगमध्ये के-१, के-२, के-४ तसेच कॅनोईंगमध्ये सी-१, सी-२ असे २०० मी., ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होतील.

### क्रीडा क्षेत्राबाबत शासनाची चांगली धोरणे

क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी राज्य शासनाने खूप चांगली धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर एक कोटी आणि राज्य स्तरावर ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात असल्याची माहिती ना. पाटील यांनी दिली.

भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे कालपासून जोरदार सुरुवात झाली. ना. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रदर्शनीय सामन्यांना त्यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले. अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

> कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून, पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धा स्थळाची खास वैशिष्ट्ये आहेत.
>
> - डॉ. सुरेश गोसावी,
> प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कागलच्या जैव विविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातर्फे पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे

कोल्हापूर : कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले आहेत.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्युकेशन सोसायटीतर्फे कागल येथे जैव विविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम चालू आहे. या ठिकाणी शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागाच्या वतीने नुकतेच पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.

तीव्र उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पक्ष्यांसह छोट्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने सार्थ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. त्यानुसार हिंदी अधिविभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उद्यानात श्रमदानातून दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले. वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुढ्ढे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाणवठे तयार



करण्यात आले. हिंदी अधिविभागातील डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले तसेच संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

अमोल बुढ्ढे यांनी उपस्थितांना पक्ष्यांसाठी तयार घरटी वाटप केली व त्यांचे महत्त्व समजून सांगितले. यावेळी डॉ. दिलीप माळी यांनी जैव विविधता उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, प्रकल्पाचे भविष्यातील नियोजन, सामाजिक महत्त्व तसेच जैव विविधतेची गरज याबद्दल माहिती दिली. हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.